मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगूज

अंक ३० ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून १९९७

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## ६वे मराठे परिवार संमेलन, रत्नागिरी

### ४,५ ऑक्टोबरला कोकण रेल्वेने रत्नागिरीला येण्याचे आवाहन

मराठे प्रतिष्ठानचे परशुराम भूमीशी मातीचे नाते आहे. ते रक्ताच्या नात्यापेक्षा अधिक दृढ आहे. पोटासाठी ही भूमी सोडून पिढ्यान् पिढ्या उलटल्या, नव्या पिढीतल्या माणसांनी कोकणाचे दर्शनसुद्धा घेतलेले नसले तरी **'आम्ही मूळचे कोकणातले' असे अभिमानाने सांगण्याची संधी कोणीही दवडीत नाही. कारण? कारण ही ओढ मातीच्या मायेची आहे.**

दिल्ली, कलकत्ता, भोपाळ, बडोदा, इंदूर - एवढेच काय, पण साता-समुद्रापार अमेरिका. इंग्लंड, जर्मनी येथे घरटी बांधलेली कोकणी पाखरं कोकण रेल्वेची प्रतीक्षा नववधूसारखी करीत होती. कोकण रेल्वे सुरू झाल्यावर ही आगगाडी जणू आपल्या अंगणातून जाणार आहे या उत्साहाने ही पाखरं मोहरून गेली आहेत.

**याच कोकण रेल्वेने रत्नागिरीला येण्याचे आवतण मराठे प्रतिष्ठान आपल्याला तब्बल तीन महिने अगोदर देत आहे.** वेळ भरपूर आहे तेव्हां 'आयत्यावेळी या गोष्टी जमत नाहीत' या कारणाची नाकेबंदी झालेली आहे.

**आनंदराव मराठ्यांचं प्रशस्त गुरुकृपा मंगल कार्यालय (पऱ्याची आळी) आपल्या पाहुणचाराला सज्ज आहे.** गणपती-पुळ्याचा गणपती आणि पावसचे सद्गुरू स्वरूपानंद यांचे आशीर्वाद आपल्या मस्तकी आहेत आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे कार्य आपल्या घरचं आहे. कार्य मराठ्यांचं आहे तेव्हा गप्पा-गोष्टी, खाणं-पिणं सर्व काही अघळपघळ! फक्त **मोठेपणाची, मानपानाची कवच-कुंडलं रत्नागिरीच्या वेशीवर उतरून ठेवायची आणि वारकरी श्रद्धेने, दिंडीच्या चालीने मंडपात पाऊल टाकायचे. दोन दिवसांच्या आनंद मेळाव्यात दु:खाचा भागाकार आणि सुखाचा गुणाकार मांडायचा.**

सर्वांची व्यवस्था नीट करता यावी म्हणून खालील माहितीचे **सभासद नोंदणी पत्रक मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या पत्त्यावर (ड्राफ्टसह) कृपया त्वरित पाठवावे.**

**सभासद नोंदणी पत्रक**

१. संपूर्ण नाव व पत्ता :
२. बरोबर येणाऱ्या कुटुंबीयांची नावे :
३. दोन दिवसांच्या निवास, भोजनादि व्यवस्थेसह माणशी रु. १५०/- प्रमाणे संमेलन शुल्काची रक्कम : (संमेलन शुल्क मुंबईतल्या बँक ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावे)

सभासदाची सही.

संमेलनासंबंधी सविस्तर माहिती आपणाला यथावकाश कळविण्यात येईल. **- कार्यवाह.**

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळाच्या सभा

दर महिन्याच्या दुसऱ्या (व गरजेनुसार चौथ्या) शनिवारी कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. या वेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी येऊ शकतो. मागील तिमाहीत ८ मार्च, १२ एप्रिल आणि १० व ३१ मे रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.

८ मार्च सभेत प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष **श्री. गजानन विनायक** (पृ. ११५) यांनी 'आदर्श माता' या विषयावरील निबंधस्पर्धेच्या बक्षिसांसाठी दिलेल्या रु. ६०० च्या देणगीचा साभार स्वीकार करण्यात आला.

## देणग्या

१५.२.१९९७ रोजी ठाणे लघुउद्योजक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री. मधुसूदन रामकृष्ण खांबेटे (पृ. ६९५) यांच्याशी आयोजिलेल्या चर्चेच्या कार्यक्रमानंतर **बोरीवली, मुंबई येथील कुलबांधव श्री. अरुण गणेश** (पृ. २९०) यांनी शिक्षण निधी आणि हितगुज संवर्धन निधी यांसाठी प्रत्येकी रु. ६०० प्रमाणे देणगी दिली. दरवर्षी जसा 'आयकर' भरतो त्याच पद्धतीने प्रतिवर्षी सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेतून प्रतिष्ठानला देणगी देण्याचा आपला संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमशीलतेबद्दल त्यांचे खास आभार.

प्रतिष्ठानचे क्रियाशील कार्यकर्ते **श्री. सीताराम गोपाळ खांबेटे** (पृ. ६७६) अंधेरी, मुंबई यांनी त्यांची मुलगी **कै. कुमारी अनिता** हिच्या स्मरणार्थ कुलबांधवांपैकी इ १०वी, १२वी, मिडल स्कूल व हायस्कूल स्कॉलरशिप या परीक्षांत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येकी रु. २५१/- असे भरघोस पारितोषिक देण्यासाठी प्रतिष्ठानच्या शिक्षण निधीला रु. १०,००० देणगी जाहीर केली आहे.

## हितगुज

हितगुज प्रकाशनाची स्वयंपूर्ण योजना जून १९९४च्या अंकापासून सुरू झाली. दोनशे रुपये तहहयात वर्गणीत ८ पानांचे वर्षाला ४ अंक देणे अभिप्रेत होते. मात्र गेल्या तीन वर्षांतल्या १२ अंकांपैकी फक्त दोनच अंक ८ पानांचे होते; सात अंक १२ पानांचे, दोन अंक १६ पानांचे तर एक अंक २४ पानांचा होता.

**विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनियरिंग शिक्षणासाठी अर्थसहाय्य**

ठाणे येथील कुलबांधव श्री. नारायण वामन (पृ. ६९८) व त्यांच्या पत्नी सौ. विजयालक्ष्मी खांबेटे यांनी पुत्र विनय याच्या स्मृती निमित्ताने प्रतिष्ठानकडे ठेवलेल्या ठेवीतून कुलबांधवांना मेडिकल अथवा इंजिनिअरिंग शिक्षणासाठी रु. ३०,००० पर्यंत बिनव्याजी कर्ज मिळू शकेल. आपली माहिती देऊन प्रतिष्ठानकडे याबाबत अधिक चौकशी करावी.

हे शक्य झाले ते कुलबांधवांच्या सहकार्यामुळेच. हितगुज संवर्धन निधीला देणग्या, जाहिराती, अंकांतील पुरवण्यांचे - पृष्ठांचे प्रायोजन अशा विविध मार्गांनी अनेकांनी अर्थसहाय्य केले. सुरेशभाऊंनी तर दर अंकात एक जाहिरात देण्याचे आश्वासन दिले आहे. आणखी असे (जाहिरात) दाते मराठे कुळांत निश्चितच आहेत. अजून आम्ही त्यांच्यापर्यंत पोचलो नाही.

वाचकांच्या अपेक्षा वाढत आहेत. अंक तिमाही बदलून मासिक करावा अशीही काहींची मागणी आहे. यासाठी **पाळी गोवा येथील सभासद गोविंद नारायण** (पृ. ५४१) यांनी असे सुचवले आहे की देणगी रूपाने रक्कम घेऊन हितगुजमध्ये फोटो छापावे. अपत्यजन्म, बाळाचा वाढदिवस, मौजीबंधन, नवविवाहित दांपत्ये, मानसन्मान-सत्कार, सेवानिवृत्ती, पन्नाशी, साठी, पंच्याहत्तरी अशा प्रसंगांचे फोटो छापल्यास ती एक कायमची आठवण होईल.

या अंकापासूनच या नवीन उपक्रमाची सुरवात करीत आहो. **कुलबांधवांनी किमान रु. ५०० च्या देणगीसह अशा प्रसंगाचे फोटो हितगुजमध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावे. तसेच मृत नातेवाईकांचे पुण्यस्मरणहि रु. ५०० ची १/८ पान जाहिरात देऊन करता येईल.**

वाढत्या अपेक्षा, वाढती पाने व वाढता खर्च यांची सांगड घालण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने एक तरी वर्गणीदार करावा, माहेरवाशिणींना वर्गणीदार करावे; अपत्यप्राप्ती, वाढदिवस, विवाह, पुण्यस्मरण यांसारख्या निमित्ताने हितगुज संवर्धन निधीला किमान रु. ५०० देणगी द्यावी आणि स्वतःचा उद्योग-व्यवसाय करणाऱ्यांनी दरवर्षी हितगुजमध्ये ३ ते ५ हजारांच्या जाहिराती द्याव्या असे कुलबांधवांना पुन्हा आवाहन आहे.



Marathe Pratishthan

## शैक्षणिक मदत व पारितोषिके

कपिगोत्री मराठे परिवारांतील मराठे, विद्वांस, खांबेटे, चक्रदेव, जोशी, जाईल, फडणीस व रटाटे आडनावाच्या **गरजवंत विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानच्या शिक्षणनिधीतून मदत** दिली जाते. गरजूंनी संकोच न बाळगता याबाबत प्रतिष्ठानकडे पत्तव्यवहार करावा.

तसेच निरनिराळ्या परीक्षांत यशस्वी होणाऱ्या **विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानतर्फे प्रोत्साहन म्हणून खालीलप्रमाणे गुणवत्ता पारितोषिके** दिली जातात.

१. इ. १०वी - ७०% रु. १०१, ८५% रु. १५१
२. इ. १२वी - ६०% रु. १०१, ८०% रु. १५१
३. पदविका/पदवी प्रथमवर्ग रु. १०१, ७०% रु. १५१
४. पदव्युत्तर परीक्षा विशेष प्राविण्य रु. १०१
५. अन्य अभ्यासेतर उपक्रम - किमान राज्य पातळीवरील स्पर्धा अथवा परीक्षांत विशेष प्राविण्य रु. १०१

**आपल्या घरातल्या, शेजारच्या अथवा माहितीतल्या मराठे परिवारांतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची माहिती १५ ऑगस्ट १९९७ पूर्वी** आवश्यक कागदपत्रांसह, मराठे प्रतिष्ठानकडे पाठवावी.

## कुलबांधवांचे कलादर्शन

मागील अंकांत जाहीर केल्याप्रमाणे कुलबांधवांच्या कलादर्शनाचा पहिला वहिला कार्यक्रम मुंबईत मराठे उद्योग भवनाच्या गच्चीत २४-५-१९९७ रोजी सादर करण्यात आला. यासाठी **आयोजक श्री. सी. गो. खांबेटे (पृ. ६७६), आणि श्री. शेखर खांबेटे (पृ.७०५), कार्याध्यक्ष सुरेशभाऊ आणि कार्यवाह विनायक केशव** यांनी सर्व कलाकारांसह कार्यक्रमाआधी दोन-तीन दिवस पूर्वतयारी केल्यामुळे कार्यक्रम अप्रतिम झाला. कार्यक्रमाचा वृत्तांत या अंकात तपशीलवार दिला आहे. कार्यक्रमासंबंधी **उत्स्फूर्तपणे आलेले एक खुषीपत्र :**

"कार्यक्रमाचे आयोजन, व्यवस्थेपासून उपाहारापर्यंत सर्व काही उत्तमच होते. कलाकारांनी त्यांचे कलादर्शन तर इतके उत्कृष्ट व सफाईदारपणे सादर केले की ते ३ तास कसे गेले ते समजलेच नाही. कार्यक्रमाचे सूत्रधार श्री. भाऊ मराठे (सदानंद विष्णु पृ. ५०७) यांनी त्यांच्या अभ्यास व उत्तम वक्तृत्त्वशैली या गुणांमुळे संचालन इतके सुरेख केले की त्यामुळे कार्यक्रमाची शोभा कितीतरी पटीने वाढली."
**- डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ. २८४) घाटकोपर, मुंबई.

या कार्यक्रमाच्या यशाचे श्रेय अर्थातच सर्व कलाकारांचे. परिश्रमपूर्वक, निरलसपणे, प्रसंगी पदरमोडहि करून आपली कला सादर करण्यात त्यांनी जे प्रतिष्ठानवरील प्रेम व्यक्त केले त्यामुळे कार्यकर्त्यांची उमेद खचितच वाढली आहे.

प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष सुरेशभाऊ यांनीहि प्रशस्त जागा व सुशोभित मंडपाची सोय स्वखर्चाने करून दिल्यामुळेच कार्यक्रम इतक्या दर्जेदारपणे सादर करणे शक्य झाले, या गोष्टीचाहि आवर्जून उल्लेख करायला हवा.

☆

### कु. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके

इ. १०वी, १२वी, मिडल् स्कूल व हायस्कूल स्कॉलरशिप या प्रत्येक परीक्षेत मराठे कुलबांधवांपैकी सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येकी रु. २५१ चे कु. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक देण्यात यावयाचे आहे. १९९६-९७ मध्ये वरील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कुलबांधव विद्यार्थ्यांनी आपली माहिती **१५ ऑगस्ट १९९७ पर्यंत** आवश्यक कागदपत्रांसह कार्यवाह, 'मराठे प्रतिष्ठान' यांजकडे पाठवावी.

### संवाद

"मार्चचा अंक आम्ही उभयतांनी लगेच वाचून काढला. नेहमीप्रमाणे उत्तम जमला आहे. अंक वाचल्यावर दखल घ्यावी अशी वाटणारी महत्वाची गोष्ट म्हणजे १५.२.१९९७ ची उद्योग-व्यवसायाचा संदर्भ असलेली महत्त्वाची सभा. प्रतिष्ठानने केवळ एकाच कार्यात गुंतून पडावे असा कायदा कोणी पास केला तर ते हे कार्य असायला हवे असे मला वाटते." - विनायक गोपाळ (पृ.६९), सनीव्हेल, कॅलिफोर्निया.

***(भाऊसाहेब, तुमच्याशी प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ संपूर्ण सहमत आहे. आपले कार्याध्यक्ष सुरेशभाऊ यांचा तर हा निदिध्यास आहे हे आपण जाणताच. उद्योग प्रवणता रुजवण्याच्या कार्याची पताका खांद्यावर घेण्यासाठी कोणीतरी ध्येयवेडा तरूण पुढे यायला हवा. पाहू कोण स्वयंप्रेरणेने पुढे येतात ते!)* - संपादक**



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

### मानसन्मान

**ICWAI फौंडेशन परीक्षेत प्रथम क्रमांक**

**कराड येथील सभासद गोपाळ दामोदर यांचा मुलगा अनंत** (पृ. ५५३) याने इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडिया या संस्थेच्या फौंडेशन परीक्षेत देशांत पहिला क्रमांक पटकावला. तो पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सचा विद्यार्थी असून १२वीच्या परीक्षेंतहि तो कोल्हापूर विभागांत गुणवत्ता यादींत ५वा आला होता. कुमार अनंतच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व मराठे कुटुंबीयांतर्फे त्याचे हार्दिक अभिनंदन आणि पुढेहि असेच यश लाभो अशा अनंत शुभेच्छा!

**पेट्रोलियम इंजिनियरिंगमध्ये पी.एच्.डी.**

प्रतिष्ठानचे **ठाणे येथील सभासद राजेंद्र विठ्ठल** (पृ. २९१) यांनी जुलै १९९६ मध्ये आय. आय. टी., पवई मधून पेट्रोलियम इंजिनियरिंग या विषयांत पी. एच्. डी. मिळवली. तेल आणि वायू महामंडळात महत्त्वाच्या स्थानावरील काम सांभाळून वयाच्या ५२व्या वर्षी मिळवलेले डॉ. राजेंद्र यांचे हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे. सर्व कुलबांधवांतर्फे डॉ. राजेंद्र यांचे अभिनंदन आणि भावी यशाबद्दल शुभेच्छा!

**महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत रौप्य पदक**

**सौ. वृषाली श्रीरंग (पृ.४७१), अनगोळ, बेळगांव** यांना 'रण दोघांचे' या नाटकांतील स्त्रीभूमिकेबद्दल महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत रौप्य पदक मिळाले. तसेच **सौ. वृषाली व श्रीरंग** दोघांनाहि बृहन्महाराष्ट्राच्या दिल्लीच्या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरीचे प्रशस्तिपत्रक मिळाले.

**रमा रविकिरण यांचे कथाकथन**

मार्च १९९७च्या दुसऱ्या आठवड्यात कारवारमधील मराठी वाङ्मय मंडळाच्या दुसऱ्या वर्धापनदिन सोहळ्यांत **बेळगांवमधील सभासद डॉ. सौ. रमा रविकिरण** (पृ.५३५) यांनी 'मिनी सासरी जाते' ही स्वतःची कथा आणि 'लेणे चैतन्याचे' व 'भाऊबीज' या कथात्मक कविता सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

### नांदा सौख्यभरे

१) **पुण्यांतील प्रतिष्ठानचे सभासद श्री. विनायक शंकर खांबेटे (पृ. ६७६) यांची कन्या विनया** हिचा विवाह चारुदत्त शिरीष केळकर यांच्याशी पुण्यात ११.४.१९९७ रोजी संपन्न झाला. वधुवरांस प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

२) **भांडुप, मुंबई येथील सभासद मनोहर महादेव चक्रदेव (पृ.७३२) यांची कन्या स्वाती** हिचा विवाह विलेपार्ले, मुंबई येथील मिलिंद महादेव फडके यांचेशी १७.५.१९९७ रोजी विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघात थाटामाटाने साजरा झाला. वधुवरांस मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

३) बिंबल, गोवा येथील प्रतिष्ठानचे **सभासद श्री. सीताराम यशवंत (पृ. ५२०) यांची मुलगी प्रशीला** हिचा विवाह पुणे सकाळमधील उपसंपादक मुकुंद वीरेंद्र लेले यांच्याशी श्री देव रवळनाथ महालक्ष्मी संस्थान, मुळगांव, गोवा येथे १८.५.१९९७ रोजी थाटामाटात साजरा झाला. प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य व हितगुजचे संपादक श्री. लक्ष्मण शंकर (पृ. ५२०) तसेंच गोव्यातील प्रतिष्ठानचे अनेक सभासद यावेळी उपस्थित होते. यानिमित्ताने पुण्यांत २२.५.९७ रोजी आयोजित केलेल्या स्वागत समारंभाला सकाळ वृत्तपत्रसमूहाचे मुख्य संपादक श्री. कुवळेकर, कार्यकारी संचालक श्री. पवार तसेच सकाळ परिवारांतील आणि पुण्यांतील वृत्तपत्रक्षेत्रांतील अनेक नामवंतांनी उपस्थित राहून वधु-वरांस शुभाशीर्वाद दिले.

४) प्रतिष्ठानचे क्रियाशील सभासद, **ठाण्याचे श्री. सदाशिव गोपाळ जोशी (पृ. ७४१) यांची कन्या विभावरी** हिचा शुभविवाह राजेश प्रभाकर कुलकर्णी यांचेशी ठाणे येथे २४.५.१९९७ रोजी सुसंपन्न झाला.

**कुतूहल**

१) कोकणस्थांची कुलदैवते प्रामुख्याने शंकर-पार्वतीशी संबंधित आहेत. कोकणस्थ मूळ द्रविड शैव असावे काय?

२) लग्नाच्या वेळी मुली लक्ष्मी-विष्णुच्याऐवजी गौरी-हराची पूजा कां करतात?

३) लग्नानंतरहि लगेच मंगळागौर आणि 'फसकी' ही शंकर-पार्वतीचीच व्रते करतात. लक्ष्मी-विष्णुची कां नाही? - **रमेश भिकाजी (पृ.३६५)**, पुणे.


***(श्री. रमेश भिकाजीप्रमाणे अनेकांना हे कुतूहल असणार. माहितगारांनी या प्रश्नांची उत्तरे पुढील अंकांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. - संपादक)***



Marathe Pratishthan

प्रतिष्ठानचे संस्थापक कार्यवाह व प्रचलित कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री. वामन गणेश (पृ.५०३) यांनी या समारंभास आवर्जून उपस्थित राहून वधु-वरांस कुलबांधवांतर्फे शुभेच्छा दिल्या.

**कुर्यात बटोर्मंगलम्**



बटु निखिल आणि राहूल

१) प्रतिष्ठानचे **सहकार्यवाह श्री. अनंत रामचंद्र (पृ. ३९२) यांचे नातू चि. राहूल आणि चि. निखिल** (दूरदर्शनवरील सर्वपरिचित निवेदिका सौ. मंजिरी व श्रीनिवास यांचे पुत्र) यांचा व्रतबंध दि. ८.५.१९९७ रोजी मुंबईत साजरा करण्यात आला. बटूंस मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभाशीर्वाद.

२) प्रतिष्ठानचे **बेळगांवमधील सभासद श्री. शाम यशवंत (पृ. ५२५) यांचा मुलगा शशांक** याचा व्रतबंध दि. ८.६.१९९७ रोजी बेळगांवात साजरा झाल. बटूस प्रतिष्ठानतर्फे शुभाशीर्वाद.

**सहवेदना**

१) **कऱ्हाड येथील कुलबांधव श्री. मधुकर विष्णु** (पृ. ५५८) यांना शुक्रवार दि. ७.३.१९९७ रोजी वयाच्या ६७व्या वर्षी देवाज्ञा झाली. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

२) **कोल्हापूर येथील प्रतिष्ठानचे सभासद श्री. भालचंद्र कृष्ण (पृ. ४२७) यांची धाकटी बहीण सौ. शकुंतला मनोहर पाध्ये** यांचे बडोदा मुक्कामी २४.३.१९९७ रोजी ६६व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्या मराठे प्रतिष्ठानच्या देणगीदारही होत्या. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

**वरील सर्वांच्या कुटुंबीयांच्या दुःखात अखिल मराठे परिवार सहभागी आहे.**

☆

## 'खेळ'कर उद्योगी कुटुंब सौ. उर्मिला व दिनकर मुकुंद (पृ.२७९), पुणे.

**- लक्ष्मण शंकर (पृ. ५२०)**, मुंबई (फोन:५६८०१०४)

उर्मिलाबाईंचा खेळणी बनवण्याचा व्यवसाय असल्याचे कळले. सफल महिला उद्योजक म्हणून त्यांचा परिचय 'हितगुज' मधे द्यावा म्हणून त्यांना भेटायला गेलो. किचन-कम-हॉलमधे तास-दीडतास त्यांच्याशी मनमोकळया गप्पा मारून परतताना लक्षात आले की उर्मिलाबाईंचा खेळणी उद्योग आता त्यांच्या एकटीचा राहिलेला नाही. त्यांचे पति दिनकर व पुत्र विवेक आणि विक्रम या साऱ्यांचाच तो आता कुटुंब उद्योग झालेला आहे.

सौ. उर्मिला-दिनकर. टिपिकल मध्यमवर्गीय कुटुंब. दिनकररावांची टेल्कोत नोकरी. जागा लांब शहराबाहेर. शाळकरी दोन मुलगे. त्यांना सोयीचे व्हावे म्हणून पुण्यात मध्यवस्तीत जागा घेतली. उर्मिलाबाईंच्या लक्षात आले की आता केवळ काटकसर करून भागणार नाही आपणहि अर्थार्जनाचा मार्ग शोधायला हवा.

शिक्षण मॅट्रिक पर्यंत. ना कुठली पदवी ना अनुभव. नोकरी कोण देणार? म्हणून त्यांनी जून १९८३ मध्ये 'नूतन बालशिक्षण संघा'च्या बालवाडी प्रशिक्षण वर्गात नाव घातले. ही परीक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण झाल्या. एकदोन ठिकाणी नोकरी मिळण्याची शक्यता होती. पण त्यांच्या पतीचा नोकरीला विरोध होता. त्यांची स्वतःची नोकरीहि मोठ्या नाइलाजाने चालू होती. कुठला तरी धंदा काढायचा ही सुप्त इच्छा.

विचारांती कल्पना सुचली ती बालवाडी शाळांची जुनी मोडकी लाकडी साधने दुरुस्त करून, रंगवून, नवीन करून द्यायची. 'जुने टाकुनी नवीन घ्या' असा हा 'मायाबाजार' उर्मिलाबाईंनी काही दिवस चालवला. सुमारे शंभरेक शाळांचे खेळ त्यांनी दुरुस्त करून दिले. आपल्या घरातच उर्मिला- दिनकर खेळणी दुरुस्त करायचे, रंगवायचे. मुलगेहि आपल्या परीने ठोकाठोकी, रंगकामात हौसेने सामील व्हायचे.

Marathe Pratishthan

यातूनच आकार घेतला बालवाडी शैक्षणिक साधनांचा कारखाना काढण्याच्या कल्पनेने. कारखान्यासाठी जागा, यंत्रसामग्री घेतली. पुण्यातल्या रुपी बँकेने उर्मिला-दिनकरांची पूर्वपीठिका, चिकाटी आणि जिद्द यांच्या तारणावर भांडवल पुरवले. आणि उर्मिला बाई स्वत:च्या वर्कशॉपमधे मदतनीस कामगारांबरोबर जातीने राबू लागल्या. १९८६ साली 'मॉडेल स्कूल सप्लायर्स' ची स्थापना केली.



दिनकर, सौ. उर्मिला, विक्रम, त्याच्या मांडीवर सृष्टी, आणि पाठीमागे विवेक व त्याची पत्नी सौ. अनघा

शाळांची गरज ओळखून नवनवीन खेळणी व शैक्षणिक साधने त्यांनी बाजारात आणली. याबाबत दिनकररावांची शोधक दृष्टि उपयुक्त ठरली. निरनिराळया देशी परदेशी पुस्तकातली व मासिकातली खेळणी पाहून, त्यात आपल्या कल्पनेने आपल्याकडील वातावरणाला साजेसे बदल केले. मुलांच्या कल्पनेला चालना देणारी, त्यांना आपलीशी वाटणारी खेळणी तयार केली. मोठ्या जागा व्यापणारे काही खेळ घडीचे बनवून छोट्या जागांतल्या बालवाड्यांची अडचण दूर केली.

१९८७ मधे दिनकररावांनी नोकरी सोडून पूर्णपणे घरच्या व्यवसायात स्वत:ला झोकून दिले. उर्मिलाबाईंच्या मनात धाकधूक होती. दोन मुले पदराला होती. पगाराचा शाश्वत 'रतीब' ठोकरून नित्य चढउतार असणाऱ्या अशाश्वत अशा उत्पन्नावर सर्वस्वी अवलंबून राहतांना त्यांचे मन थोडे चलबिचल झाले. पण दिनकररावांच्या काही उद्योजक मित्रांनी त्यांना दिलासा दिला. 'आम्ही तुमच्या पाठीशी आहोत' असे आश्वासन दिले.

या संदर्भात उर्मिलाबाईंना मी विचारले की नोकरी सोडण्याचा निर्णय तुमचा दोघांचा की एकट्या दिनकरांचा? त्यावर त्यांचे उत्तर मोठे मार्मिक. त्या म्हणाल्या 'संसाराच्या रथाला दोन चाके असतात ती दोन्ही एकाच दिशेने चालावी लागतात'. लगेच घाईघाईने त्या पुढे म्हणाल्या 'आम्ही सर्व व्यवहार घरात सर्वांशी चर्चा करून करतो. अगदी मुलांपासूनहि आम्ही काही लपवून ठेवत नाही. त्यामुळे त्यांनीहि फार समजूतदारपणा दाखवला. विवेक शाळेत असतानाची गोष्ट वर्ष संपायच्या दीड-दोन महिनेच आधी त्याचा गणवेष फाटला. तो म्हणाला, 'आई, कशाला नवीन गणवेष शिवायचा महिन्याभरासाठी? मी इन ऐवजी औट करून वापरीन.' विक्रम कॉलेजात असतानाची गोष्ट. सर्व मित्र पँटीत कॉलेजला येत. विक्रमने फक्त एकाच पँटवर भागवले. सुट्टीच्या दिवशी धुवून इस्त्री करून तीच वापरायची.

नोकरी सोडल्याचा कधी पश्चाताप नाही का झाला असे विचारले असता उर्मिलाबाई म्हणाल्या आव्हान म्हणून, जाणीवपूर्वक नोकरी सोडल्यामुळे पश्चाताप होण्याचा प्रश्नच नव्हता. अडचणी अनेक आल्या. धंद्यात चढउतार यायचेच. प्रसंगी दागदागिने गहाण टाकून बँकेतून कर्ज घेतले आणि महत्वाची गोष्ट म्हणजे ते वेळच्या वेळी परतहि केले. परिणामी आमची पत वाढत गेली. बँकेतून आम्हाला जास्त जास्त कर्ज मिळू लागले.

दिनकरांप्रमाणेच त्यांचे दोन्ही मुलगेहि हळुहळु घरच्या व्यवसायात सामील झाले. थोरला विवेक मॅट्रिक झाल्यानंतर त्याच्याच बिनधास्त भाषेत 'पुढे शिकण्याची इच्छा नसल्यामुळे' खेळण्याचे दुकान व विक्री व्यवहार पाहू लागला. विक्रमहि फाईन आर्ट डिप्लोमा आणि आर्ट टीचर डिप्लोमा मिळवल्यानंतर 'आपल्या घरात मांड मांडलेला असताना दुसऱ्याच्या दारात नोकरीसाठी कशाला जायचे' या भावनेतून घरच्या व्यवसायात सामील झाला.

दिनकररावांच्या महत्वाकांक्षेला पंख फुटले. विक्रमवर वर्कशॉपची जबाबदारी सोपवून त्यांनी व्यवसायवाढीवर आपले लक्ष केंद्रित केले. गावोगावी आपल्या खेळण्यांची प्रदर्शने भरवून व्यवसायाच्या वाढविस्ताराची जबाबदारी त्यांनी पत्करली. पुढे त्यांच्या एका मित्राच्या सहकार्याने कोल्हापुरातहि नुकतेच दुकान व वर्कशॉप चालू केले आहे.



Marathi Pratishthan

मराठ्यांच्या या व्यावसायिक यशाची कारणे काय ती जाणून घ्यायचा प्रयत्न केला असता मराठे पतिपत्नी दोघेहि उत्स्फुर्तपणे एकसुरांत म्हणाले 'जिद्द, आत्मविश्वास, प्रामाणिकपणा आणि कष्टांची तयारी. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नाही'.

दिनकर मराठे पुढे सांगू लागले, मार्केटमधे एस्टॅब्लिश होण्यासाठी सचोटी आणि मालाचा दर्जा या गोष्टी फार जपाव्या लागतात. त्याचबरोबर सतत नव्यानव्या कल्पना वापरून आम्ही मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल, त्यांच्या उपजत प्रवृत्तीला वाव मिळेल अशी खेळणी बनवतो. अनेक शाळांतल्या शिक्षिकाही उपयुक्त सूचना करतात. आम्ही आमच्या साधनात सुधारणा करतो. एखादी शाळा नवीन खेळाची कल्पना घेऊन आली तर आम्ही त्यांना हवी तशी साधने बनवून देतो.

बालवाडी प्रशिक्षणात बालमानसशास्त्र शिकलेल्या उर्मिलाबाई आता पुढे सरसावल्या. 'सर्व साधने आम्ही लहान मुलांसाठी बनवत असल्यामुळे ती सुरक्षित असली पाहिजेत याबाबत आमचा कटाक्ष असतो. खेळांना कंगोरे असता कामा नये, याची दक्षता घ्यावी लागते. तसेच मुले खेळण्यांची आदळआपट करणारच हे गृहीत धरून खेळण्यांचा टिकाऊपणा व भक्कमपणा यांकडे लक्ष द्यावे लागते.'

उर्मिलाबाई त्यांच्या खेळण्यांची वैशिष्टये सांगू लागल्या- डोलणारा घोडा हा मुलांचा आवडता खेळ. पण तो सर्वच बनवतात. म्हणून त्यात थोडा बदल करून उंच मानेचा काळ्या पिवळ्या रंगातला आकर्षक जिराफ बनवला. खेळता खेळता मुलांचा मानसिक विकास साधण्यासाठी लहानमोठी बाहुली घरे बनवली. एका घडीच्या घराचे छप्पर व भिंती सुट्या करता येतात. एका दुमजली घरात बाहुलीला खाली-वर करण्यासाठी चक्क लिफ्ट पण आहे. मुलांच्या निर्मिती क्षमतेला वाव देण्यासाठी १२८ ठोकळयांच्या युनिट बिल्डींग ब्लॉकच्या सेटपासून मुले स्वत: निरनिराळ्या आकाराची घरे बनवू शकतात. मोठी माणसे हातोडी, स्क्रू ड्रायव्हर, स्पॅनर असल्या गोष्टींना मुलांना हात लावू देत नाहीत . म्हणून आम्ही त्या मुलांसाठी लाकडाच्या बनवल्या. वापरायला हलक्या, मुलांना इजा पोचायला धोका नाही, आणि त्यांची ठोकाठोकीची हौसहि भागली.

व्यवसायाच्या या सर्व रामरगाड्यात मराठे पतिपत्नींनी आपले निसर्गप्रेम हरवले नाही. वर्षात निदान एकदा तरी सिंहगडावर जायचा परिपाठ अव्याहत चालू ठेवला आहे. त्यांचा मुलगा विवेक एक बुजुर्ग रॉक क्लाइंबर म्हणून या धाडसी खेळांत मान्यता पावला आहे. विशेष म्हणजे यांतले धोके स्वीकारण्यात आई-वडील आणि पत्नी अनघा यांनाहि विवेक इतकेच थ्रिल वाटते.

मराठे कुटुंबाच्या या निसर्गप्रेमाची एक गमतीशीर गोष्ट सांगायलाच हवी. विवेकला जर मुलगा झाला तर 'निसर्ग' आणि मुलगी झाली तर 'सृष्टी' ही नावे त्यांनी जन्मापूर्वीच पक्की केली होती आणि विशेष म्हणजे त्यांची ही चिमुकली 'सृष्टी' हि अभिमन्यूप्रमाणे आईच्या पोटातच निसर्गप्रेमाचे धडे घेऊन जन्मलेली दिसते. अवघ्या १५ महिन्यांची सृष्टी पुण्याजवळ खानापूरच्या जंगलात तीन दिवस आईबरोबर तंबूत राहून आली आहे. 'तंबू बाहेरची चिमणी पाखरे, झाडपाने यांच्याशी खेळण्यात ती दंग असायची'- इति विवेक.

उर्मिला-दिनकर यांना लहान मुले आवडतात. आपल्या दुकानात आलेल्या मुलांना ते खेळण्यांना मुक्तपणे हात लावू देतात. पण झोपडपट्ट्या, अनाथाश्रम अशा ठिकाणच्या मुलांना अशी खेळणी कोण देणार? अशा गरिबीतल्या अनेक बालवाड्यांना मराठे पतिपत्नींनी देणगी दाखल खेळणी देऊन तिथल्या मुलांच्या जीवनांत आनंद फुलवण्याचा प्रयत्न केला आहे.

'करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभुशी तयाचे' असे म्हणतात. उर्मिलाबाईंचे असे देवाशी नाते जडलेले असावे. अनेक कौटुंबिक व व्यापारतल्या कठीण प्रसंगी देवानेच त्यांना जणू अदृश्य हाताने संकटनिवारण करून तारले आहे अशी त्यांची श्रध्दा आहे. ☆

**प्रतिसाद**

"हितगुज चांगल्यारीतीने चालावे म्हणून वेळोवेळी केलेल्या आवाहनानुसार आदर्श माता या निबंधस्पर्धेत मला मिळालेले बक्षिसाचे रु. २०० स्वखुषीने देणगी म्हणून देत आहे. मी एका खाजगी प्रिंटिंग प्रेस मधे काम करणारा एक कामगार. मनात असून देखील मी जास्त आर्थिक मदत करू शकत नाही. तरी पण खारीचा वाटा म्हणून पाठवलेल्या रकमेचा स्वीकार व्हावा."

**- सदानंद प्रभाकर विद्वांस (पृ.६५८)**
मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत

Marathe Pratishthan

# कलादर्शन मेळावा

**२४.५.१९९७**

**- भाऊ मराठे**
**(सदानंद विष्णु पृ.५०७),**
मुंबई





**कार्यक्रमाची रंगत चाखण्यात रंगलेले प्रेक्षक**

मराठे प्रतिष्ठानने कुलबांधवांचा छोटा मेळावा दि. २४ मे ९७ रोजी मराठे उद्योग भवनाच्या प्रशस्त गच्चीत आयोजित केला होता. आपल्या महाराष्ट्रात विशिष्ट आडनाव असलेल्यांच्या व्यवसायांच्या monopoly आहेत. 'कुलकर्णी' म्हटले की 'व. दि.', 'वा. ल.' आणि 'द. भि.' असे समीक्षक डोळयासमोर उभे रहातात. 'दांडेकर' हे नाव उच्चारल्याबरोबर 'सोनोपंत', 'गो. नी.' असे हरी भक्त परायण आठवतात. त्याप्रमाणे 'मराठे' या उपनावात इतके उत्कृष्ट कलाकार आहेत हे २४ मे रोजी समजलं.

कार्यक्रमाचं स्वरूप गीतांचे सादरीकरण आणि कथाकथन असे असून सुद्धा ११ कलाकारांच्या सहभागाचे आयोजन कुलबांधव **शेखर खांबेटेने** (पृ.७०५) फार सुंदर रीतीने केले होते. कुठेही फाफटपसारा न येता कार्यक्रमाला एक चटपटीतपणा होता. **श्री. विनायक केशव** (पृ.२०), कार्यवाह मराठे प्रतिष्ठान यांच्या प्रास्ताविकानंतर, **सौ. शुभदा पांडुरंग जोशी (पृ.७४७), कु. संध्या खांबेटे (पृ.६९६), आणि चंद्रप्रभा खांबेटे** (पृ.७०५), (वामन गोविंद यांची नात) ह्यांनी म्हटलेल्या ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरवात झाली.



प्रथम **स्वरांगी मुकुंद** (पृ.३६९), वय वर्षे ५, ह्या कै. पं. राम मराठे यांच्या नातीने 'वंदित राधा बाला गोप सख्या घननीळ' हे 'गोपालकृष्ण' चित्रपटातले राम मराठ्यांनी गाजवलेले गीत आत्मविश्वासाने सादर केले. तिच्या सादरीकरणातली धिटाई पाहिल्यावर



Marathe Pratishthan

आणखी काही वर्षांनी स्वरांगी उत्तम गायिका होणार हे उपस्थित रसिकांना जाणवले. उर्दूमध्ये म्हणतात, 'बडे मियाँ सो बडे मियाँ लेकिन छोटे मियाँ सुभानल्ला'. स्वरांगी आगे बढो.




ईशस्तवन - कु. संध्या व चंद्रप्रभा खांबेटे व सौ. शुभदा जोशी
तबल्यावर श्रीपाद जाईल आणि पेटीवर सौ. विद्या जाईल

स्वरांगी नंतर **चंद्रप्रभा खांबेटे** हिने 'ही वाट दूर जाते, स्वप्नामधील गावा' हे शांताबाई शेळक्यांचे गीत सादर केले. कलावंत स्वतःच्या घरी कितीही चांगला गायला तरी श्रोत्यांसमोर गाणं ही एक वेगळी गोष्ट आहे. चंद्रप्रभा नवोदित गायिका असली तरी कार्यक्रमाच्या सुरवातीला तिला मुद्दामहून गायला लावले होते. श्रोत्यांच्या उपस्थितीचे दडपण मनावर न घेता गाता आले पाहिजे असा यामागे उद्देश होता. आणि हा उद्देश चंद्रप्रभाने उत्तम गाऊन सिद्ध केला.

अकौंटन्सी ह्या विषयाच्या प्राध्यापिका असलेल्या **सौ. सुलभा सुरेंद्रनाथ** (पृ.२८४) ह्यांनी व. पु. काळे यांची 'हसरे दुःख' ही कथा अतिशय सुंदररीत्या सादर केली. मुळात 'व. पुं.'ची ही कथा नुसती वाचायचीच नाही तर सांगायची सुद्धा. ह्या कथेतली सबनीस दांपत्याच्या उभ्या जीवनाला व्यापून टाकणाऱ्या वेदनेची घुसमट सौ. सुलभा मराठ्यांनी कमालीच्या परिणामकारक रीतीने सादर केली.

'मिलेटरी इंजिनियरिंग'मधल्या कुठल्याही ग्लॅमर नसलेल्या वातावरणात काम करून निवृत्त झालेल्या **सौ. शुभदा जोशींनी** आपल्या गाण्याचा छंद जोपासला. 'क्षणभर उघडी नयन देवा' आणि 'पाहुनी रघुनंदन सावळा' ही दोन गीतं त्यांनी सादर केली. **सौ. सेजल संजय** (पृ.६३) ह्यांनी संगीत विषयात पदवी मिळवली आहे. त्यांनी हिंदी चित्रपटगीतांचे सादरीकरण हा व्यवसाय म्हणून स्वीकारला आहे. त्यांनी 'आयेगा आनेवाला' आणि 'ठाणे काही काही बोल सुणावा' हे मीरेचे भजन अशी दोन गीते सादर केली. त्यांना **सिंथेसायजरवर त्यांचे पती संजय** ह्यांनी फार सुंदर साथ केली.



'आयेगा आनेवाला' म्हणताना सौ. सेजल
तबल्यावर शेखर खांबेटे आणि सिंथेसायजरवर संजय

**सौ. मालविका आणि सौ. मंजिरी मराठे** ह्या दूरदर्शनवरच्या वृत्तनिवेदिका. त्यांच्या वृत्तनिवेदनातल्या सहजतेबद्दल प्रश्नच नाही. परंतु ह्या दोघीजणी कथा कशा काय सादर करतात याची उपस्थित रसिकांना मोठी उत्सुकता होती. सौ. मालविका मराठ्यांनी 'पुरुष' ही वसुधा पाटील यांची कथा सादर केली. सौ. मंजिरीने (पृ.३९२) 'वाघच पण मिस्टर वाघ नव्हे' ही व. पु. काळ्यांची कथा सादर केली. मालविकाची कथा निखळ गंभीर तर मंजिरीची कथा विनोदाची झालर असूनसुध्दा गंभीर विचार देणारी. दूरदर्शनसारख्या अत्यंत sensitive माध्यमात ह्या दोघींना का निवडले गेले याचा प्रत्यय ह्या दोघींच्या कथा ऐकत असताना रसिकांना आला. स्वच्छ शब्दोच्चारांबरोबरच लयबध्द शब्दोच्चार कसा असतो हा सुखद अनुभव दोघींनी दिला. सहज जाता जाता सुचवावेसे वाटते की मालविका-मंजिरी-सुलभा मराठ्यानी स्वतःच्या कथाकथनाचा कार्यक्रम सादर करायला काहीच हरकत नाही.

**श्री. मुकुंद मराठे (पृ.३६९) आणि श्री प्रभंजन मराठे (पृ.२५५)** ह्यांनी सादर केलेला 'कानडा राजा पंढरिचा' हा अभंग म्हणजे दोन अतिशय तयार गायकांची चाललेली झुंज होती. मूळ गाण्यात सुधीर फडके आणि वसंतराव देशपांड्यांनी जो



Marathe Pratishthan



**प्रभंजन व मुकुंद मराठे यांची 'झुंज'**

अनुभव दिला होता नेमका तोच अनुभव मुकुंद आणि प्रभंजनने दिला. मुकुंद मराठे यांचे (पं. राम मराठ्यांचे चिरंजीव) 'जयोस्तुते हे उषादेवते' हे गीत ऐकत असताना आपण क्षणभर नाटकाच्या थिएटरात मंदारमाला नाटकाचा प्रयोग पहात आहोत असे रसिकांना वाटले, इतकी मुकुंदाच्या गाण्यावर रामभाऊंच्या गायकीची छाप होती.

**प्रभंजन मराठे** आज अनेक वर्षे वाद्यवृंदातून गात आहे. 'मेंदीच्या पानावर' ह्या गाजलेल्या वाद्यवृंदाच्या संस्थापकांपैकी तो एक. नुकतेच त्याने 'मुक्ता' ह्या चित्रपटात गीत गाऊन पार्श्वसंगीत गायनाच्या क्षेत्रात पदार्पण केले आहे. प्रभंजनने 'ॐकार स्वरुपा सद्गुरु समर्था' आणि 'कुणी जाल का सांगाल का' ही दोन गीते अत्यंत सुरेल सादर केली. 'गाता गळा आणि शिंपता मळा' असं म्हटलेलं आहे. गळा गाता हवा. प्रभंजनने एकनाथ पंत कुलकर्णी (पतियाळा घराणे) आणि एस. के. अभ्यंकर (ग्वाल्हेर घराणे) यांच्याकडे तालीम घेतली. पण गायकाला नुसती 'ट्युशन' असून चालत नाही तर 'इन्स्टुयुशनसुद्धा' लागते. ती इंट्युशन असली तरच गायक प्रभंजनसारखा छान गाऊ शकतो.

**संध्या खांबेटेने** 'चांदणे शिंपीत जाशी' आणि 'हे शामसुंदर राजसा मनमोहना' ही दोन म्हणायला कठीण अशी गीते गाऊन आपली गाण्याची तयारी दाखवली. तिचा गाण्यातल्या लयीशी खेळण्यातला सहजपणा वाखाणण्यासारखा होता.

**श्री गणेश जाईल** (पृ.७५७) आणि मंडळी तर सगळेच गाण्यातले. गणेश जाईल यांनी 'मर्मबंधातली ठेव ही' हे नाट्यपद दमदारपणे म्हटलेच. पण त्यांचे **चिरंजीव श्रीपाद आणि पत्नी सौ. विद्या** यांनी संपूर्ण कार्यक्रमात पेटीची उत्तम साथ केली. श्रीपादला तबल्यासाठी national talent schloarship मिळाली असून त्याची आई मुंबई महानगरपालिकेच्या शाळांत गायन शिक्षिका म्हणून काम करते.

शेवटी **शेखर खांबेटे**. त्याच्या तबलावादनाचे आणखी कौतुक काय करायचे. पु. ल. देशपांड्यासारख्या रसिकाग्रणीच्या कौतुकाची थाप त्याच्या पाठीवर पडलेली आहे. त्याची तबल्याची साथ गायकाच्या गाण्याला कधी गस्त घालीत नाही तर गायकाचे गाणे जास्तीत जास्त रंगतदार कसे व्हावे असी इच्छा बाळगणारी असते. त्याने साथ केलेले 'बैठकीची लावणी', 'देवगाणी' हे कार्यक्रम केवळ सुंदर ह्या शब्दात मोडणारे.

खरा गायक केवळ तंबोऱ्याच्या चार तारा आणि पाचवा मानला गेलेला 'पंचम' यांच्या आधारावर संगीताचा स्वर्ग उभा करतो. ह्या कार्यक्रमात फक्त पेटी आणि तबला एवढ्या दोनच वाद्यांच्या आधारावर सर्व गायकांनी आपली कला सादर केली ह्याला तोड नाही.

सर्व कार्यक्रमाचे सूत्र संचालन **श्री. सदानंद विष्णु (भाऊ मराठे)*** ह्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आंतरराष्ट्रीय कीर्तिचे व्हायोलिनवादक पं. व्ही जी जोग यांचे तितक्याच तोलामोलाचे फिल्मलाईन मधले बुजुर्ग व्हायोलिन वादक बंधु श्री. अनंत जोग आणि प्रतिष्ठानचे कार्यक्रम आपल्याच घरचे कार्य समजून ते चांगल्या तऱ्हेने साजरे व्हावे म्हणून जातीने लगबग करणाऱ्या सौ. सुलभाताई (सुलभा सुरेश - पृ.३९९) यांच्या हस्ते सर्व कलावंतांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आंब्याची डाळ आणि पन्हे असा 'वासंतिक' निरोप घेऊन रसिकमंडळी चांगला कार्यक्रम ऐकल्याच्या समाधानात घरी गेली.

☆

***(* भाऊंच्या भाष्यामुळे कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली असा अभिप्राय अनेक उपस्थितांनी दिला. 'मणिना वलयम्, वलयेन मणि:' असा हा मणिकांचन योग मला साधता आली नाही याची रुखरुख मनाला लागून राहिली आहे. - संपादक)***



Marathi Pratishthan



मंजिरी मराठे - कथाकथन



गणेश जाईल यांना पुष्पगुच्छ देताना अनंत जोग.
त्यांच्या शेजारी वाकलेले सी. गो. खांबेटे




सुलभा सुरेंद्रनाथ यांचा सत्कार करताना सुलभा सुरेश



मालविका मराठे
'पुरुष' कथा सांगताना

दोन 'भाऊ' - परस्परं प्रशंसन्ति?



कार्याध्यक्ष सुरेशभाऊ आणि सूत्र संचालक भाऊ मराठे

**चि. राहूल** व **चि. निखिल** यांच्या व्रतबंधानिमित्त बटूंचे **आई-वडील सौ. मंजिरी - श्रीनिवास** व **आजोबा श्री. अनंत रामचंद्र** (पृ. ३९२), प्रतिष्ठानचे सहकार्यवाह, यांनी कलादर्शन मेळावा वृत्तांताची ४ पाने प्रायोजित केली आहेत.



Marathe Pratishthan

# अथा तो सर्प जिज्ञासा

- राहूल रमेश (पृ. ३६५), पुणे.



स्लाईड शो करताना राहूल

***B.Sc. Zoology शिकणाऱ्या राहूलने पुण्याजवळच्या कात्रज येथील सर्पोद्यानात जाऊन सापांना पकडण्याचे, हाताळण्याचे व पाळण्याचे प्रशिक्षण घेतले आहे. नागपंचमीला पुण्याच्या गरवारे कॉलेजात सर्पविषयक प्रदर्शन भरविण्याची कल्पनाही त्याने यशस्वीपणे राबविली. पुण्यातल्या बऱ्याच शाळा कॉलेजात जाऊन त्याने विद्यार्थ्यांना पर्यावरण व वन्यजीवनाचे प्रशिक्षण दिले आहे. -संपादक***

श्री गणरायांना भोजन जास्त झाल्यामुळे त्यांनी आपल्या उदरावर सर्पाचा आवळपट्टा बांधला. हे बघून सूर्य व चंद्र श्री गणरायांना बघून हसायला लागले. त्यामुळे श्री गणरायांना खूप राग आला आणि त्यांनी क्रोधातच सर्पाला सूर्य व चंद्र या दोघांस गिळंकृत करण्याचा आदेश दिला. सर्पाने गणरायांच्या आदेशानुसार सूर्य व चंद्र यांस गिळंकृत करताच सगळीकडे अंध:कार पसरला. त्यामुळे सर्व देवांना गणरायांजवळ येऊन त्यांच्यासमोर प्रार्थना केली. त्यांच्या विनंतीचा मान राखून श्री गणरायांनी सूर्य व चंद्र यांस सोडून दिले व ठराविक दिवशीच त्यांना गिळंकृत करण्यात येईल असे सांगितले. ह्यालाच सूर्यग्रहण व चंद्रग्रहण असे म्हणतात. ह्यावरून असे समजता येईल की अगदी पुराणातसुध्दा सर्पांचा उल्लेख आलेला आहे.

सर्पांचा आपल्या जीवसृष्टीत फार वाटा आहे. अगदी सोपं गणित असे की, एक साप मारला तर उंदरांची एक जोडी जगते व उंदरांची एक जोडी जगल्यास हीच जोडी वर्षभरात ८८८ उंदरांना जन्म देते. उंदरांमुळे आपल्या भारतातील २०.२५% धान्याची नासधूस होते.

भारतात सर्पाच्या २५० जाती आहेत. यापैकी महाराष्ट्रात ५२ जातींचे साप आहेत. त्यापैकी फक्त ४ जातींचे साप (नाग, घोणस, फुरसे व मण्यार) विषारी असून उरलेल्या जाती बिनविषारी आहेत.

साप हा सरपटणारा व शीत रक्ताचा प्राणी आहे. त्याच्या शरीरावर केस नसतात. अंगावर खवले असतात. सापांना कान नसतात, ते कंपनाद्वारे आपल्या हालचाली निश्चित करतात. साप आपले भक्ष्य जिभेच्या सहाय्याने शोधतो. साप आपली जीभ बाहेर काढतो. भक्ष्याने सोडलेले रासायनिक कण हवेद्वारे सापाच्या जिभेवर येऊन चिकटतात. नंतर साप आपली जीभ आत घेतो. सापाच्या टाळूवर असलेल्या जेकॉब सन्स ऑर्गन (Jacob sons organ) नावाच्या अवयवाद्वारे रासायनिक कणांचे पृथ:करण केले जाते व सापाससमोर भक्ष्य आहे असे कळते.

सापाने एकदा भक्षण केल्यावर तो पुढचे काही दिवस काही न खाता राहू शकतो. सापांचे अन्न म्हणजे उंदीर, घूस, लहान कीटक, लहान पक्षी. काही मोठे साप उदा. अजगर हे मोठे प्राणी सुध्दा खातात. अगदी परवाचीच गोष्ट, अजगराने एका हरणाला गिळले. ही बातमी आपण वाचली असेलच. काही जातीचे साप उदा. नागराज हा फक्त इतर जातीचे साप खाऊनच जगतो.

रानात राहणाऱ्या सापांचे सर्वसामान्यपणे किती आयुष्यमान असते हे अजून समजू शकलेले नाही. बंदिवासातील साप हा १० ते १५ वर्षे जगतो. सापांची वाढ ही त्यांच्या कात टाकणे या क्रियेवर अवलंबून असते. आपण जसा आपल्या पायातील मोजा काढतो त्याच प्रकारे साप आपली कात टाकतो. साप हा नागमोडी वळणं घेत सरपटतो किंवा असे सुध्दा म्हणता येईल की साप हा इंग्रजीतील S या अक्षराप्रमाणे सरपटतो. वाळवंटातील काही साप हे आडव्या उड्या मारत सरपटतात.

साप हे आपला बचाव विविध प्रकारे करतात. उदा. फूत्कारणे, अंग फुगवणे, रंग बदलणे, चावणे. नाग फणा काढतो. घोणस प्रेशर कुकरसारखी शिट्टी वाजवून आपल्या शत्रूस घाबरवितो. तसकर साप हा मानेचा भाग फुगवितो.

सापांचे संरक्षण करण्यासाठी 'भारतीय वन्यजीवन कायदा अधिनियम १९७२' निर्माण करण्यात आला आहे. ☆

Marathi Pratishthan

# आदर्श माता कशी असावी

***आदर्श माता निबंध स्पर्धेतील प्रथम पारितोषिकाचा निबंध मागील (मार्च १९९७) अंकांत प्रसिद्ध केला होता. अन्य स्पर्धकांच्या निबंधातील त्रोटक उतारे येथे प्रसिद्ध करीत आहो.***

***पुण्यांतील मानसतज्ज्ञ सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०) यांचे बालक आणि पालक या विषयावरचे पांच लेख हितगुजमधे प्रसिद्ध झाले आहेत. स्पर्धेसाठी आलेल्या काही लेखात या लेखमालेतील विचार प्रतिबिंबित झाल्याचे जाणवले. हितगुजमधून पेरले ते रुजते आहे ही जाणीव संपादक म्हणून निश्चितच सुखद आहे!***

***'आदर्श माता' निबंधाबाबतही अशीच अपेक्षा आहे. घरांतली वडीलधारी मंडळी आपल्या विवाहित-अविवाहित मुलींपर्यंत (आणि मुलांपर्यंत) या लिखाणातले विचार आवर्जून पोचवतील व आदर्श माता निर्मितीच्या कार्यातला आपलाहि खारीचा वाट उचलतील अशी आशा करावी काय? - संपादक***

## चांगले(च) बघण्याचा चष्मा

**- सौ. वृषाली संजीव चक्रदेव**, कुळगांव-बदलापूर

निरागसता, अपूर्व कुतूहल, विलक्षण जिज्ञासा आणि माया असं अपूर्व रसायन शैशवांत आढळते. या वयातले आपले अनुभव मुलं आपल्या आईबरोबर वाटून घेततात. याच काळांत प्रत्येक मातेने आपले मूल कसे आहे हे समजून घेतले पाहिजे. त्याच्या प्रत्येक कृतीचे निरीक्षण केले पाहिजे. या निरीक्षणातून त्याच्या वागण्याचा अर्थ लावला पाहिजे. त्याच्या प्रत्येक कृतीमागचा कार्यकारणभाव समजून घेतला पाहिजे.

माझ्या मुलाला (वय वर्षे ६) आगगाड्यांचे विशेष आकर्षण वाटते हे मला अचानकच कळले. त्याला इंजिने, आगगाड्या यांच्यातला वेगळेपणा खूपच कळतो. या आवडीच्या विषयाचे त्याचे ज्ञान सखोल आहे. आता त्याला जपान देशातली बुलेट ट्रेन, समुद्राखालची टनेल ट्रेन आणि बिनास्लीपर्सची बोगद्यातून जाणारी कोकण रेल्वे बघण्याची जिज्ञासा वाटते. ही जिज्ञासा वाढवण्याचे काम मातेने करायचे असते. बालवयातील निर्लेप मनावर ज्ञानाचे व संस्कारांचे लेप

*पुढील पानावर*

**हसरे हितगुज**

### होलसेल 'शुटिंग'

काय म्हणता? होलसेल शुटिंगचे दुकान असूच शकत नाही? आहे - आहे. आम्ही पाहिले आहे. पत्ता पुढील अंकात पहावा. तुम्ही कोणी पाहिले असल्यास पत्ता कळवावा. तोही छापू पुढील अंकात. अधिकस्य अधिकम् फलम्। - संपादक

## मुलांनाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असते

**- सौ. मीना सदानंद (पृ.४१७)**, वांद्रे, मुंबई.

आई हे बालकाचे श्रद्धास्थान असते. प्रत्येक मुलाला आपली आई हुषार, प्रेमळ, सुंदर आहे असे वाटते. बालकाच्या या भावनांना तडा न जाऊ देणे हे प्रत्येक आईने आपले उत्तरदायित्त्व मानले पाहिजे.

मातेच्या आदर्शपणाचे निकष तिच्या बालसंगोपनापासूनच लावायला हरकत नाही. बाळ का रडते आहे? त्याला भूक लागली आहे की झोप आली आहे, की कुठे दुखते-खुपते आहे हे त्याच्या रडण्यावरून ओळखील ती खरी आदर्श माता!

बाल्यावस्थेतून कुमारावस्थेत येताना तर आपल्या मुलांना समजावून सांगण्यासारखे व त्यांना समजून घेण्यासारखे बरेच काही असते. ह्या वयांत त्यांच्यात नैसर्गिकरीत्या होणारे शारीरिक व मानसिक बदल समजावून देणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी परस्परातील जवळीक व सामंजस्य आवश्यक असते. विशेषतः मुलीला तर आईची जवळीक अत्यंत आवश्यक असते.

आपल्या मुलांची काळजी घेताना त्यांचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याचा विसर पडू देता कामा नये. घरगुती बाबतीत त्यांचा विचार जरूर घ्यावा. एखादी समस्या त्यांना सांगा, एखादे जबाबदारीचे काम त्यांच्यावर सोपवा. त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

मुलांचा मित्र, मार्गदर्शक व तत्त्वज्ञ बनण्याचा आईने प्रयत्न करावा. तुमचा आदर्श पुढे ठेवून मुली देखील आदर्श माता बनतील. ही आदर्शपणाची ठेव त्यांच्या जीवनात संपत्तीपेक्षाही मोलाची ठरेल. ☆

Marathe Pratishthan

# मातेचे वागणे आदर्श असेल तर मुलेही तसे वागतात.

- **सौ. शीला विलास (पृ.२३५)**, ठाणे (प.)

जिच्या चांगल्या गुणांचा परिणाम मुलांवर व्हावा अशी माता आदर्श म्हणावी लागेल. पण ही माता नुसती निराकार, निर्विकार देवता बनून गाभाऱ्यांतील पूजेची मूर्ती म्हणून राहणारी नसावी. आपल्या मुलांवर जिवापाड प्रेम करणारी, डोळ्यांत तेल घालून त्यांची निगराण करणारी, वेळप्रसंगी लहान मूल होऊन त्यांच्यांत खेळणारी, त्यांच्या सुखदुःखांना जपणारी अशीमाता असावी.

पण याहीपेक्षा लाहनपणापासूनच त्यांना इष्ट असे वळण लावणारी, त्यांच्यावर सन्मार्गाचे संस्कार करणारी, मुलांच्या 'हे काय', 'ते काय' अशा जिज्ञासू प्रश्नांना न कंटाळता न वैतागता योग्य अशी उत्तरे देणारी, त्यांच्या बुद्धीला योग्य ते खतपाणी घालून त्यांची विचारशक्ती विकसित करणारी माता असावी. त्यांचे योग्य ते हट्ट पुरवणारी, पण त्यांच्या अवास्तव हट्टांना फाटा देऊन त्यांना मार्गदर्शन करणारी, थोरांच्या कथा सांगून मुलांमध्ये जिद्द, चिकाटी, धैर्य, जिज्ञासूपणा, कल्पकता यासारखे गुण उत्पन्न करणारी माता असावी. लहानपणापासूनच स्वावलंबनाची व काटकसरीपणाची सवय लावणारी माता असावी.

लहान मुले अनुकरणप्रिय असतात. ती मोठ्यांचे वर्तन नकळत पहात, अनुभवत असतात. त्याप्रमाणे स्वतः वागत असतात. घरातील सर्वांची काळजी घेणारी, इतरांसाठी कष्ट घेण्यास तयार असणारी, आपले खरे असले तरी मोठ्यांचा मान राखण्यासाठी प्रसंगी मौन बाळगण्याचे धैर्य असणारी माता असेल तर मुलेही तसे वागतात. मातेचे वागणे आदर्श असेल तर मुलेही तसे

**समस्यापूर्ती**

**'.... पुत्रे मित्रवदाचरेत् ।'**

या आधीच्या काव्यपंक्ती लिहून श्लोकाचा अर्थ आणि आपले पूर्ण नाव, पत्ता व जन्मतारीख यांसह **३१ जुलै १९९७ पर्यंत** संपादक हितगुज यांस कळवावे - लहानथोर कोणीही.

**वीस वर्षाखालील स्पर्धकांना रु. २५, १५, १०. अशी तीन बक्षिसे - संपादक**

# बालवयातच योग्य संस्कार हवे

- **सदानंद प्रभाकर विद्वांस (पृ.६५८)**, मुद्रे बुद्रुक

आदर्श माता म्हणजे शांत स्वभावाची, सर्वांना सांभाळून घेणारी, अडल्या-पडल्याला मदत करणारी, बऱ्याचशा माता अशा असतात देखील. पण ज्या नसतात त्या अशा कां नसतात याचा विचार केल्यास आपणास याचे उत्तर मिळणे कठीण नाही. पुढे होणाऱ्या माता ज्या बालवयात असतात त्या वेळेस जर त्यांच्यावर चांगले संस्कार झाले तर त्या भविष्यात नक्कीच आदर्श माता बनतील. लहानपणी त्यांना योग्य शिक्षण, मार्गदर्शन आणि वागणूक हे सर्व न देता त्यांच्याकडून आदर्श मातेची अपेक्षा करणे म्हणजे त्यांच्यावर अन्यायच आहे. प्रतिकूल परिस्थितीत राहून देखील पुढे आदर्श माता ठरलेल्या व्यक्तीसुद्धा समाजात आहेत. पण अशी उदाहरणे क्वचितच! ☆

## चांगले(च) बघण्याचा चष्मा *मागील पानावरून*

चढवायचे असतात. प्रत्येक मातेचे हे कर्तव्य आहे. प्रत्येक मातेने आपल्या मुलाला सहवासाचा सुगंध द्यावा. मग तिलाही मुलाच्या फुलण्याचा सुगंध अनुभवता येतो.

हळुहळु बाल्यावस्थेतून मूल किशोर अवस्थेत पोचते. याच वयात मातेने मुलामध्ये वयोमानानुरूप वागणे, सहज आचरण, राष्ट्रप्रेम या गुणांचे सिंचन करावे. सुखाबरोबर दुःखातहि साथ करावी. आपल्या हळुवार फुंकरीने दुःख हलके करायला शिकवावे. प्रत्येक गोष्टीला एक विधायक तर दुसरी विध्वंसक बाजू असते. विधायक बाजू बघायची सवय मातेनेच मुलाला शिकवायला हवी.

आलेला प्रत्येक क्षण आनंदात जगावा. वाईट क्षण विसरावा. विस्मृतीच्या दानाचा परमेश्वराने दिलेला वर संजीवनी म्हणून वापरावा. आपोआपच पुढचेहि जगायचे क्षण आनंदी होतात. ही शिकवण मातेने मुलांना द्यायची असते.

बाजारात हल्ली अनेक प्रकारचे चष्मे मिळतात. पण एक चष्मा-चांगले बघण्याचा चष्मा, फक्त माताच मुलांना देऊ शकते. आपल्याजवळ चांगले बघण्याचा चष्मा असेल तर तो आपल्या मुलांना आपोआपच मिळेल हे प्रत्येक मातेने लक्षात ठेवावे. ☆

Marathe Pratishthan

वागतात. 'शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी'!

सध्या टी. व्ही., रेडिओ यांसारख्या अनेक दृक्‌श्राव्य माध्यमांनी मुलांना नको एवढ्या गोष्टी समजत आहेत. त्यांचे आकर्षण वाढत आहे. यातल्या अयोग्य गोष्टी गप्पा स्वरूपात नकळत समजावून देऊन त्यांपासून आपल्या मुलांना दूर, अलिप्त ठेवणे हे केवळ माताच करू शकते. आपली मुले सुरक्षित रहावी या दृष्टीने योग्य-अयोग्य, इष्ट-अनिष्ट यांची जाणीव करून देऊन मुलांना सद्यस्थितीचे अवलोकन व विचार करायची संधी मातांनीच प्राप्त करून दिली पाहिजे. ☆

### खुषीपत्र

हितगुज अंक २९ (मार्च १९९७) नेहमीप्रमाणे चांगला निघाला आहे. सत्कार समारंभाचे ११वीत शिकत असणाऱ्या रोहितने केलेले वर्णन कौतुकास्पद आहे. नेटके वर्णन, धावती वर्तमानकाळांतील भाषा आणि क्रम हे सारे फारच छान जमले आहे.
- **डॉ. ह. वि. सरदेसाई,** हृदयरोगतज्ञ, पुणे.
(प्रेषक : वामन आत्माराम (पृ.३६६), पुणे)


**२७ वर्षांपूर्वी आयात पर्याय पारितोषिक विजेते 'स्विफ्ट' आता निर्यातीसाठी सज्ज**



*जागतिक बाजारपेठ मिळविण्यासाठी अमेरिकन तंत्रज्ञानाने बनविलेले 'स्विफ्ट-मल्टीलिथ १२७०' ऑफसेट प्रिंटींग मशीन*

**स्विफ्ट्स लिमिटेड**

**मराठे उद्योग भवन,** आप्पासाहेब मराठे मार्ग, मुंबई-२५.


## मातेने मुलांशी मैत्रीचे नाते जोडावे

**- सौ. शुभदा पांडुरंग (पृ.७४७)**, बोरिवली, मुंबई.

मुलांना चांगले वळण लावणे हे आदर्श मातेचे मुख्य कर्तव्य आहे. घरात मोठी माणसे असतील तर त्यांचा आदर करायला मुलांना शिकवले पाहिजे. मुलांच्या देखत त्यांना उलट उत्तरे देऊ नये म्हणजे मुलेहि तुमचा आदर ठेवतील. भावंडांनी एकमेकांवर प्रेम करावे मदत करावी, भांडू नये असे मुलांना शिकवावे. त्यासाठी मातेनेही घरात वागताना सावधगिरीने वागावे, भांडणतंटा करू नये. सर्वच मुले सारखीच हुशार असतील असे नाही. त्यामुळे मातेने त्यांची तुलना करू नये.

मुलांना ज्याची आवड असेल, जी कला अवगत असेल त्याप्रमाणे शिक्षण द्यावे. आपली आवड मुलांवर लादू नये. मुलांनी अभ्यास केला की नाही ते जातीने पहावे. चांगले मार्क मिळाले तर कौतुक करावे. म्हणजे त्यांना जास्त उत्साह वाटेल. आनंदी वातावरण घरात निर्माण करून त्यांचे मन घरात रमविणे हे आदर्श मातेचे कौशल्य व कर्तव्य आहे.

आपले मूल कसे आहे हे सगळेच्या सगळे मातेला माहीत असते असा गोड गैरसमज असतो. पण ३ वर्षाचे बालक, ८/१० वर्षांचा मुलगा-मुलगी, दहावीचा मुलगा-मुलगी, व कॉलेज युवक-युवती या स्थित्यंतरातून मूल जात असते, बदलत असते. तान्हा असलेला कान्हा, कॉलेजयुवक झाल्यावर स्वतःचा स्वामी बनतो. हे इतके हळूहळू होते की मूल आईच्या हातून कधी निसटून जाते ते कळत सुद्धा नाही. शाळेतली सगळेच्या सगळे सांगणारी सोनुली कॉलेजला दांड्या मारून फिरते असे कळल्यावर माता सैरभैर होते.

त्यामुळे मातेने मुलांच्या होणाऱ्या या बदलांकडे जागरूकतेने पाहिले पाहिजे. त्यांच्या मित्र-मैत्रिणी कोण आहेत, कशा आहेत याची चौकशी केली पाहिजे. मुले काय करतात कोठे जातात यावर लक्ष ठेवले पाहिजे. त्यांना विश्वासात घेऊन चांगले काय, वाईट काय याची समज दिली पाहिजे. त्यांच्याशी मैत्रीचे नाते जोडून त्यांना विचार करायला प्रवृत्त केले पाहिजे व स्वावलंबी बनविले पाहिजे. ☆

***१०वी, १२वीच्या सफल विद्यार्थ्यांना मराठे प्रतिष्ठानच्या शुभेच्छा!***

Marathe Pratishthan

## हितगुजला शुभेच्छा!

**Nandesh Lokhande**
Customer Support Engineer

**Satish Marathe**

# *Metronics*

**A Truth in weighing balance maintenance**

Approved by
The Standards of Weights and
Measures Dept. Govt. of Maharashtra.

2A, Soman Building, Room No. 4,
Ground Floor, Dr. Bhalerao Marg,
Girgaon, Mumbai-400004.
Ph. : 3857374 / 3859454
Fax : 91-22-3859454.


## या अंकात


१. **६वे मराठे परिवार संमेलन - रत्नागिरी** ..... पृ.१

२. **'खेळ'कर उद्योगी कुटुंब -**
**सौ. उर्मिला व दिनकर मुकुंद** .......... पृ.५-७

३. **कलादर्शन मेळावा २४.५.१९९७**
भाऊ मराठे यांनी दिलेला वृतांत - सचित्र पृ.८-११

४. **अथा तो सर्प जिज्ञासा** ..................... पृ.१२
राहूल रमेश, पुणे

५. **आदर्श माता कशी असावी** ........... पृ.१३-१५
स्पर्धेतील निबंधातील संकलित विचार

याशिवाय प्रतिष्ठान वृत्त (पृ.२-३), संवाद (पृ.३), कुतूहल (पृ.४), सभासद वृत्त (पृ.४-५), प्रतिसाद (पृ.७), हसरे हितगुज (पृ.१३), समस्यापूर्ती (पृ.१४) आणि खुषीपत्र (पृ.१५) ही नेहमीची सदरे.


बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(दू. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan